औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह येथे दोन
कारखाना [illegible] शेड बांधणे.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग.
शासन निर्णय, क्र. पीएलडी–३५९५/२/८२ /पीआरएस–२
मंत्रालय, मुंबई–४०० ०३२, दिनांक– ८ जानेवारी १९९७

वाचा:– कारागृह महानिरीक्षक, यांचे क्र. कारखाना /योजना /९३–९७/क–६[१]
दिनांक ६.२.९६ चे पत्र.

निर्णय :– औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह येथे दोन कारखाना शेड बांधण्याच्या कामाला रु. ३९,३१,९२१[रु. एकोणचाळीस लाख एकतीस हजार नऊशे एकवीस फक्त] एवढया खर्चाच्या अंदाजपत्रक नकाशे यास शासन या आदेशाव्दारे खालील अटींच्या अधीन राहून प्रशासकिय मान्यता देत आहे.

१] यापूर्वी प्रशासकिय मान्यता दिलेली कामे प्राधान्याने हाती घेऊन नंतरच संदर्भाधीन हे काम हाती घ्यावे.

२] प्रस्तुत कामासाठी अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद केल्या वेरीज प्रत्यक्षात काम हाती घेऊ नये अर्थसंकल्पात तरतूद करण्यापूर्वी सचिव समितीची मान्यता घ्यावी.

३] काम नविन स्वरुपाचे असल्याने ते विधान मंडळाच्या नजरेस आणावे.

४] काम चालू वर्षी हाती घ्यावयाचे असल्यास वार्षिक योजना १९९६–९७ मध्ये "सामान्य सेवा" या उपशिर्षाखाली गृह विभागासाठी उपलब्ध असलेल्या अंतीम तरतूदीच्या अधीन राहून प्रस्तावाचा खर्च भागवावा. यासाठी अतिरिक्त तरतूद उपलब्ध करुन दिली जाणार नाही.

२. प्रस्तावित बांधकामावरील खर्च "४०५९ सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च ०१ कार्यालयीन इमारती १०१ बांधकाम पंचवार्षिक योजनांतर्गत योजना तुरुंग मागणी क्र. एच–१५ या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा. सदरच्या कामाबाबत वित्त विभाग, दिनांक १.६.९२ सोबतच्या परिशिष्टातील अनु क्र. १/सार्वजनिक बांधकाम विभाग पुस्तीकेतील परि१३४ नियमाच्या रकाना ५ मधील "अ" नुसार त्याच नियमाच्या रकाना ६ मधील अटीच्या अधीन राहून प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे.

३. हे आदेश सार्वजनिक बांधकाम विभाग, नियोजन विभाग व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भान्वये अनुक्रमे क्र. २४८ इमारती २, दिनांक ३.८.९६ क्र. ४०० /१४११ दिनांक १०.९.९६ व क्र. सीआर–७२३/९६ व्यय–८, दिनांक ६.११.९६ अन्वये त्या त्या विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[शं. प. सोनवणे]

अवर सचिव महाराष्ट्र शासन गृह विभाग

प्रत,

कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे.

कारागृह उपमहानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे, [मुख्यालय]

कारागृह उपमहानिरीक्षक मध्य ~~[illegible]~~ विभाग ~~पुणे~~ औरंगाबाद

अधिक्षक औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह औरंगाबाद [सोबत प्रती व अंदाजपत्रक जोडले आहे.]

महालेखापाल-१, महाराष्ट्र [लेखा व अनुज्ञेयता] मुंबई/नागपूर.

महालेखापाल-१, महाराष्ट्र [लेखा व परीक्षा] मुंबई/नागपूर.

~~अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.~~ जिल्हा कोषागार अधिकारी, औरंगाबाद

~~निवासी लेखा अधिकारी, मुंबई.~~

सार्वजनिक बांधकाम विभाग, इमारत-२, अर्थ-२,

नियोजन विभाग-१४११

वित्त विभाग, व्यय-८

निवड नस्ती.